ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना :एक चिकित्सक अभ्यास

* रोहिणी सोनवणे

* संशोधक विद्यार्थिनी, पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रस्तावना:

देशाच्या सर्वगीण विकासासाठी महिलांचे सशक्तीकरण करणे ही मुलभूत बाब आहे. महिलांच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाद्वारे विविध योजना राबविन्यात येत आहेत. महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबहिण्यात येत असल्या तरि त्याच्या सामिजिक ,आर्थिक उन्नतीसाठी एकत्रित विशेष प्रयत्नाची गरज आहे .तसचे,"महिलासक्षमीकरण" लोकाभिमुख करुन लोकाचं सहभागाची जोड देण्याची देखील आवश्यकता आहे. ,त्यानुसार महिलाना संघटीत करणे, त्यांना प्रहशहक्षत करणे, स्वावलंबी करणे, महिलांकरिता राबविण्यात येत असलेल्या शासकीय योजना लोकाहिमुख करून त्यांची अंमलबजावणी गतीमान करणे, महिलांशी संमधित योजना राबविणे.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

ज्या देशात स्त्रियांना योग्य सन्मान केला जातो ते राष्ट्रीय एक आदर्श विकसनशील राष्ट्र बनू शकते. सुरुवातीला भारतीय समाजात स्त्रियांना बरेच अधिकार आणि महत्त्व होते पण उत्तर वैद्यकीय काळा आणि वैदिक काळानंतर समाज व्यवस्थेत रूढी परंपरा आल्यामुळे त्याचा परिणाम स्त्रियांवरही झाला आणि स्त्रियांचे अधिकार कमी कमी होत गेले पुरुषांनी समाजातील स्त्रियांना अधिकार हिसकावून घेऊन त्यांचे शोषण सुरू केले.

महिलांना चूल आणि मुलीकडे लक्ष द्यावे असे अनेक जणांना वाटते परंतु त्याच्या बरोबरीने देश विदेश यांच्याकडे ही लक्ष देणे गरजेचे आहे .मानवी हक्क संदर्भात आंतरराष्ट्रीय करारामध्ये मान्यता असूनही स्त्री निरीक्षर, असक्षम, राहण्याचे प्रमाण सर्वात जास्त आहे. वैद्यकीय सुविधा, मालमत्ता मालकी, पत,रोजगार ,मानसन्मान ,वागणूक, पुरुषाच्या तुलनेने तिला कमी समजले जाते .अनेक स्त्रिया घरगुती हिंसाचाराला बळी पडतात.

समाजातील समाज सुधारकाने वेगवेगळ्या रूढी ,परंपरांना बंदी आणून स्त्री सबलीकरणाचा पाया घातला .महात्मा फुले ,सावित्रीबाई फुले ,राजाराम मोहन राय , रानडे, पंडिता रमाबाई ,महर्षी धोंडो केशव कर्वे ,यासारख्या अनेक समाज सुधारकाने सतीची चाल , केशवपण, हुंडा पद्धती, बालविवाह जरठकुमारी विवाह यासारख्या रूढी परंपरा बंद केल्या. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाचे दारे उघडी केली.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे त्यामुळे बदलत्या परिस्थितीनुसार स्त्रियांच्या स्थितीवर परिवर्तन होत आहे तेव्हा जगा आणि जगू द्या हा मानव अधिकाराच्या कक्षेतून स्त्रियाकडे पाहिले गेले त्यातूनच महिला चळवळीचा प्रारंभ झाला. महिला आबला न राहता ती सबला असून तिला समज निर्मिती बंधने आचार विचार व व्यवहार यामुळे दुय्यमत्व प्राप्त झाले आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम तिच्या विकास आणि प्रगतीवर होतो म्हणून ही बंधने दूर करून तिला विकासाची संधी पोषक वातावरण निर्माण केले पाहिजे असा विचार पुढे आला त्यातूनच सबलीकरणाची संकल्पना पुढे येऊन या प्रश्नाचा गांभीर्याने विचार सुरू झाला

महिला सबलीकरणाच्या दिशेने जगामध्ये प्रत्येक राष्ट्रांमध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या घटना घडत जाऊ स्त्री प्रश्न क्रमाक्रमांने जगाच्या सामाजिक ,राजकीय ,आर्थिक धोरणाच्या कार्यक्रमाच्या अग्रभागी पोहोचला गेल्या .तीनशे वर्षातील या विविध क्षेत्रातील घटना घडामोडीचा आढावा घेतला तर हा प्रवास किती खडतर होता .

महिलांच्या सबलीकरणाची संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे .सर्वसाधारणपणे महिला सबलीकरण म्हणजे स्त्री नावाच्या भारतीय समाजातील जो भाग आहे .त्याला जीवनामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये आपल्या सूक्ष्म क्षमता प्रत्यक्षात वापरता येतील असा समाज निर्माण करणे होय. आर्थिक, सामाजिक ,राजकीय दृष्ट्या केल्या जाणाऱ्या सुधारणा मधील स्त्री-पुरुषांमध्ये व्यक्ती म्हणून समाजात स्त्रियांच्या दृष्टीने परिवर्तन होणे ही सबलीकरणाची अट आहे .दारिद्र्य आयुष्य काढणाऱ्या अनेक स्त्रिया स्वतःच्या प्रयत्नाने स्वतःचा विकास करत असताना दिसतात.

महिला सबलीकरणा अर्थ :

कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक क्षेत्रांमध्ये सामाजिक, शैक्षणिक ,राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरूषणांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करुन देने. विकासाठी संधी उपलब्ध करुन देने,स्त्री-पुरुष असमानता नष्ट करने,प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण म्हणतात.

एकंदरीत महिला सबलीकरण म्हणजे महिलांचा सत्ता विभागणीत समान वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात समानता प्राप्त होणे होय. त्याचबरोबर महिलांच्या आत्मविश्वासात वाढ, क्षमता वृध्दी, सामाजिक जाणीव जागृती, कार्यात्मक साक्षरता, लिंग समभाव, आरोग्यविषयक जागृती, सर्वांना जगण्याचीसमानसंधी, आत्मनिर्भर बनने, वित्तीय संस्थेतील आणि सर्व आर्थिक क्रियातील सहभाग म्हणजेच महिला सबलीकरण होय.

महिला सबलीकरणाचा अर्थ :

१. **डॉ.बी.आर. आंबेडकर :** महिलांच्या सर्व सबलीकरणाचा पाया त्यांच्या आर्थिक सबलीकरण आहे म्हणजेच आर्थिक सबलीकरण हीच खरी सबलीकरणाची जननी आहे.

2. **जागतिक बँक :** व्यक्तींनाकिंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची वही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि मध्ये उतरवण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सबलीकरण होय.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत् संशोधनाकरिता संशोधनकांनी दुय्यम सामुग्री वापरली आहे. संशोधनासाठी वर्णनात्मक साधनसामुग्रीचा आणि

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

विश्लेषनात्मक संशोधन पदधत् वापरली आहे. शासनाचे अहवाल, आर्थिक सर्वेक्षण, ग्रंथ, मासीक, नियतकालिके ,इंटरनेट वापरले आहे.

संशोधनाचे उद्देश :

१)महिला सक्षमीकरण योजनाचं आढावा घेणे.

२)आर्थिक सबलीकरणांवर भर देणे .

❖ **भारतीय शासनातर्फे महिला सबलीकरणाचे प्रयत्न:**

नैरोबीच्या जागतिक परिषदेच्या ठरावावर भारत सरकारने कारवाई केली. राष्ट्रीय धोरण १९८८-२००० योजना अनुषंगाने विकास कार्यक्रम संबंधित असलेल्या अनेक महिला कल्याण योजनाच्या मसुदा आहे.

श्रमशक्ती 1988 या रोजगाराविषयी आणि अनौपचारिक रोजगाराविषयी अहवाल असून सध्याच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यात अनेक सूचना आहेत. 1991 ते 2000 कालावधीमध्ये बालिकाविषयक सार्क परिषदेत ठराव मंजूर झाला. बालिकेचे जीवनसंरक्षण व विकास यातिन्ही अंगाचा विचार करून धोरण करण्यात आले. भारत सरकार महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन पातळीवरधोरणात्मक बदल केले.

महाराष्ट्र शासनाच्या महिला सक्षमीकरनासाठी केलेले योगदान :

❖ **महिला आर्थिक विकास महामंडळ:**

1975 मध्ये भारतीय कंपनी कायदा 1956 नुसार म.आ.वि.म संस्थेची स्थापना करण्यात आली. आर्थिक अडचणी असलेल्या गरजू स्त्रियांना आर्थिक व इतर लागेल ती मदत देण्याच्या उद्देशाने याची स्थापना केली गेली. गरजू स्त्रियांना काम मिळवून देणे त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजार उपलब्ध करून देणे, किंवा गटाने व्यवसाय उभारणे आणि बचत करणे याची सवय लागावी म्हणून स्वयंसेवी संघ तयार करण्यात आले. म.आ.वि.म. प्रकल्प विभागात चंद्रपूर, यवतमाळ नांदेड, पुणे असे संघ कार्यरत आहेत. दारिद्र रेषेखालील कुटुंबातील स्त्रिया, यातसदस्य होऊ शकतात. स्त्रियांना अर्थाजनाचे मार्ग शोधून काढण्याचे प्रशिक्षण दिले जाते. सध्या 7774 महिला सदस्य असलेल्या 475 संघ आहेत. लातूर आणि उस्मानाबाद या भूकंप पीडित विभागात 2280 महिला सदस्य असलेले 114 स्वयंसेवी संघ आहेत.

महिला सबलीकरणाच्या शासनामार्फतच्या योजना:

1. **आर्थिक बचत गट :** स्वयंसहायता आर्थिक बचत गट ही सबलीकरणाची प्रभावी माध्यम ठरू शकते या उद्देशाने या आर्थिक

विकास महामंडळ तर्फे बचत गट योजना मोठ्या प्रमाणात राबवण्यात आली कमीत कमी दहा सदस्यांचा एक बचत गट तयार करण्यात येतो या गटांचे बँकेत खाते उघडले जाते गटाचे सदस्य दरमहा ठराविक रक्कम गट संयोजकाकडे जमा करतो ही सर्व बचत रक्कम बँकेत ठेवली जाते आणि सरकारकडून गटाला दहा हजार रुपये अनुदान मिळते. बँकेकडून पंधरा हजार रुपये कर्ज मिळते कमीत कमी दोन टक्के व्याजाने गटातील सदस्यांना कर्जाचे वाटप केले .

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

२) **दिलासा संस्था :** औरंगाबादच्या आजूबाजूच्या खेड्यामध्ये ही संस्था कार्य करते. खेड्याचा विकास व्हावा, ग्रामीण भागातील स्त्रियांचे दुःख कमी व्हावे म्हणून दिलासा या संस्थेचे ग्रामीण स्त्रियांसाठी प्रशिक्षण, कुटुंबिक सल्ला, कायदेविषयक मदत, दुग्धव्यवसाय, बचत गट यासारखे उपक्रम हाती घेतले आहेत. ग्रामीण महिलांना स्वावलंबीबनवण्याची संघटित करण्याचे नवीन झालं खुले झाले. वर्षभरात अनेक व्यवसाय सुरू झाले तर रोपवाटिका, मळणी यंत्र ,झाडू ,टोपले, पिठाची गिरणी ,भांडी ,मंडप इत्यादी व्यवसायामधून अनेक कामगारांनी कामगिरी कौतुकास्पद आहे.

3) **वंचित विकास संस्था :** वंचित विकास संस्था ही पुण्यामध्ये झोपडपट्टी मधून कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी अस्तित्वात आलेली आहे. 1985 मध्ये याची स्थापना झाली. स्वयंसेवी संस्थेच्या सबला महिला केंद्रातून गेल्या दहा वर्षात अडीचशे महिलांचे पुनर्वसन झाले आहे. उपेक्षित ठरवलेल्या महिला सध्या समाजात ताट मानेने स्वावलंबी जीवन जगत आहेत.

4) **नारी विकास प्रतिष्ठान :** औरंगाबाद येथे 8 ऑगस्ट 1994 मध्ये या सेवाभावी संस्थेची स्थापना झाली. समाजातील परितक्त्या विधवा व पिढीत स्त्रियांच्या नेतृत्वगुणांचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न करेन करणे त्यांना कायदेशीर सल्ला देणे व त्या संदर्भात त्यांना शिक्षित करणे तसेच परितक्त्या स्त्रियांसाठी व्यवसायभिमुख प्रशिक्षण केंद्र स्थापन करून विविध उपक्रम व प्रकल्प राबवणे हा या संस्थेचा उद्देश आहे.

5) **सावली :** सामाजिक बांधिलकीची जाणीव असणाऱ्या काही कार्यकर्त्यांना एकत्र करून निराधार स्त्रियांच्या कल्याणासाठी औरंगाबाद मध्ये 1985 ला ही स्वयंसेवी संस्था स्थापन झाली .सावलीच्या निवारगृहात निराधार महिलांना सामाजिक, आर्थिक ,मानसिक स्थैर्य दिनाचा प्रयत्न केला जातो.

खाद्यपदार्थ विक्री, शिवणकाम, शिवणाची शिक्षण, ऑर्डर प्रमाणे कपडे शिवून देणे ,निवारा ग्रह चालवणे ,कौटुंबिक व कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र या विविध उपक्रमाद्वारे महिलांना सक्षम केली जाते.

6) **मनस्विनी :** अंबाजोगाई येथे एक एप्रिल 1984 ला या प्रकल्पाची सुरुवात झाली. ग्रामीण व शहरी भागातील महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी व त्यांना स्वयंरोजगारातून स्वावलंबी बनवण्यासाठी या प्रकल्पाची निर्मिती झाली. आज अनेक दुखीत, पीडित, शोषित, हुंडाबळी ,निराशीत, परितक्या इत्यादी महिलांना समाजात उभे करण्यासाठी विविध योजना केंद्राकडून राबवल्या जातात.

7) **मुख्यमंत्र्याची माजी लाडकी बहीण योजना :** महाराष्ट्रातील माता भगिनींना आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर व्हाव्यात राज्य शासनाने मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. राज्यातील महिला व मुलींना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर रोजगार निर्मितीची चालना देणे, महिलांना आर्थिक सामाजिक पुनर्वसन करणे, राज्यातील महिला व मुलींच्या सशक्तिकरणास चालना देणे , व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या मुलांचे आरोग्य पोषण स्थिती सुधारणा करणे हे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

योजनेअंतर्गत पात्र महिलेला आधार लिंक बँक खात्यात दर महिन्याला 1500 मिळतात.

8) **महिलांचा सन्मान वाढवण्यासाठी** : महिलांचा सन्मान वाढावा यासाठी लेक लाडकी ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. पिवळ्या व केशरी रेशन कार्ड धारक कुटुंबातील मुलींच्या जन्मानंतर 5000 रुपये व इयत्ता पहिली पहिलीत 6000 रुपये सहावीत 7000 अकरावीत 8000 हजार रुपये अनुदान दिले जाणार आहे. लाभार्थी मुलीचे वय 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला 75 हजार रुपये रोख देण्यात येतील, याप्रमाणे एक लाख एक हजार रुपये असा लाभ देण्यात येत आहे.

9) **मनोधैर्य योजना :** ऍसिड हल्ल्यांमध्ये बळी पडलेल्या महिला व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे पुनर्वसन व अर्थसहाय्य करण्यासाठी मनोधैर्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या आणि निकषात बदल करून आता पेट्रोल ,डिझेल ,रॉकेल आणि स्वयंपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस यासारख्या ज्वलनशील पदार्थाच्या हल्ल्यातील पिढी त्यांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे ,त्यामुळे अशा पीडित महिलांना सुद्धा मदत होत आहे.

10) **ग्रामीण महिला उद्योग विकास योजना :** आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी यांच्या सहाय्यतेने नव तेजस्विनी महिला उद्धव विकास प्रकल्पाची अमलबजावणी महिला विकास आर्थिक महामंडळ करत आहे. या प्रकल्पांतर्गत महिलांनी मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसाय सुरू करणे अपेक्षित आहे या प्रकल्पाच्या मुदतीत एक वर्षाची वाढ करण्यात आली. तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या आस्थापने वरील मंजूर कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. एकूण 523 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देली.

11) **मातृशक्तीचा सन्मान :** आतापर्यंत मुलगा किंवा मुलीला आपल्या नावापुढे केवळ वडिलांच्या नावाचा उल्लेख बंधनकारक होते; पण जन्मदात्या आईच्या नावाचा उल्लेख करणे सक्तीचे नव्हते. मातृशक्तीचा सन्मान व्हावा, म्हणून आता मुलांच्या नावापुढे आईचे नाव लावणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या मुलांच्या नावाची नोंद शासकीय दस्ताऐवजांमध्ये त्यांचे नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव या क्रमाने करण्याचे बंधनकारक आहे.

12) **पिक ई-रिक्षा :** या योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे महिलावर्ग नव्या आत्मविश्वासाने समाजात वावरेल. राज्यातील मुंबई शहर, नवी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती अशा महानगरांमध्ये पिंक ई-रिक्षा योजना सुरू करून १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसाहाय्य देण्यातयेणार आहे. यासाठी ८० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यामध्ये विशेष म्हणजे एकल महिला, विधवा, परित्यक्ता यांना प्राधान्य देण्यात येत आहे.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

13) **नवीन शक्ती सदनची निर्मिती:** शहरी भागात नोकरीसाठी आलेल्या महिलांसाठी केंद्राच्या मदतीने ५० वसतिगृहांची निर्मिती करण्यात येणार आहे. राज्यातील निराधार, निराश्रितः तसेच कौटुंबिक हिंसाचारात बळी पडलेल्या बेघर आणि लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी व सक्षमीकरणासाठी स्वाधार आणि उज्ज्वला या दोन योजनांचे एकत्रिकरण करून केंद्राच्या मदतीने 'शक्ती सदन' ही नवीन योजना राज्य सरकारमार्फत राबवण्यात येत आहे. या योजनेत राज्यात ५० नवीन शक्ती सदनांची निर्मिती करण्यात येत आहे.

14) **वन स्टॉप सेंटर:** महिलांवर होणारे शारीरिक व मानसिक अत्याचार, आर्थिक छळवणूक, समाजाकडून होणारा त्रास, अवहेलना, अशा संकटातील महिलांना वन स्टॉप सेंटरमध्ये वैद्यकीय उपचार, समुपदेशन, पोलीस साहाय्य, मानसोपचार, विधि साहाय्य, अल्प कालावधीसाठी निवारा व अन्न इत्यादी स्वरूपाची संकटात असलेल्या महिलांना जलद आणि सर्वसमावेशक मदत करण्यात येते. या सर्व सुविधा एकाच छताखाली मिळण्यासाठी वन स्टॉप सेंटर योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत हिंसाचाराचा सामना करणाऱ्या महिलांना तत्काळ मदत मिळावी, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात वन स्टॉप सेंटर उभारण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत महिलांची सुरक्षितता, सशक्तीकरण आणि संकटाच्या काळात आवश्यक मदत होते.

15) **ग्रामीण महिला उपक्रम विकास योजना:** आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (आयफॅड) यांच्या साहाय्यतेने नव-तेजस्विनी महिला उद्यम विकास प्रकल्पाची अंमलबजावणी महिला विकास आर्थिक महामंडळ करत आहे. या प्रकल्पांतर्गत महिलांनी मोठ्या प्रमाणात उद्योग-व्यवसाय सुरू करणे अपेक्षित आहे. या प्रकल्पाच्या मुदतीत एक वर्षाची वाढ देण्यात आली आहे. तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील मंजूर कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीकडून आणि राज्य शासनाचा हिस्सा असा एकूण ५२३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

16) **अंगणवाडी मदतनीसांच्या मानधनात वाढ:** राज्यातील १३ हजार मिनी अंगणवाड्यांचे श्रेणीवर्धन करून अंगणवाडी केंद्रामध्ये रूपांतर; तसेच अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्यात आली. अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा ८.३२५ रुपयांवरून १० हजार रुपये करण्यात आले, तर मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन दरमहा ५,९७५ रुपयांवरून ७,२०० रुपये आणि अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनात दरमहा ४,४२५ रुपयांवरून ५,५०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

महत्त्वाचे निर्णय

- बालसंगोपन योजनेंतर्गत परिपोषण अनुदानात १,१०० रुपयांवरून २,२५० रुपये इतकी वाढ.
- मिशन वात्सल्य योजनेसाठी आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता ९२२ कोटी रुपयांची मान्यता.
- २०२४-२५ या वर्षाकरिता वात्सल्य सदन बांधण्याकरिता

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

ठाणे, अहमदनगर, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, सिंधुदुर्ग, जळगाव, परभणी, सांगली, सोलापूर, लातूर व बीड या १२ जिल्ह्यांची निवड.

- बचतगटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरून ३० हजार रुपये वाढ.
- मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १ लाख महिलांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्याचा निर्णय.
- एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत १९,५७७ अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची भरती प्रक्रिया सुरू करण्यास मान्यता.
- अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना दिवाळीला भाऊबीज देण्याचा निर्णय घेतला. यासाठी ३७ कोटी ३३ लाख निधी उपलब्ध.
- एकात्मिक बालविकास सेवा योजनेत अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटीचा धोरणात्मक निर्णय होईपर्यंत त्यांना एकरकमी लाभ देण्याचा निर्णय.
- कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी नागरी बालविकास केंद्र सुरू करण्याचा निर्णय.

योजना क्रं७ ते क्रं १४. ह्या योजना २०२४ पर्यंत अनेक नवीन योजना महिला व बालविकास खात्यामार्फत सुरु आहेत .त्यामुळे महिला आर्थिक सक्षम झाल्या.अनेकांनी नवीन उद्योग सुरु केले .

निष्कर्ष:

1) स्वयंसहायता गटामुळे महिला सबलीकरणांमध्ये अनुकूल वातावरण तयार झालं.

२) महिलांना आर्थिक दृष्टीने सक्षम करण्यासाठी स्वावलंबी व आत्मनिर्भर व्हावे लागेल.

३) महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्या लागतील.

४) मिळालेल्या कर्जांना अनुदान तसेच परतफेडीसाठी मुदत कालावधी जास्त मिळावा.

संदर्भ ग्रंथ सूची:

१) महिला सशक्तिकरण-कृष्ण चंद्र चौधरी. सूचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार.

२) प्रदीप आगलावे 2022, सामाजिक तंत्रे व पद्धतीशास्त्र

३) मराठी विश्वकोश: महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

४) लोकराज्य महाराष्ट्र शासन

५) महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान-डॉक्टर सौ. नंदिनी तडकलकर

Cite This Article:

सोनवणे रो. (2025). **महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना : एक चिकित्सक अभ्यास.** In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XIV (Number I, pp. 191–197).